**Maharashtra Times, Pune, April 25, 2012. Pp.5**

# पुन्हा अनुभवता येणार 'आइस एज'

## 'उटी रेडिओ टेलस्कोप'च्या संशोधकांचा दावा

म. टा. प्रतिनिधी ■ पुणे
matapune@indiatimes.com

'आइस एज' अर्थातच हिमयुग आपल्यापैकी कोणीही अनुभवलेले नाही; परंतु तशाच प्रकारचे काहीसे वातावरण नजिकच्याच काळामध्ये अनुभवण्याच्या शक्यता आता निर्माण झाल्या आहेत. 'नॅशनल सेंटर फॉर रेडिओ अॅस्ट्रोफिजिक्स'च्या (एनसीआरए) अंतर्गत येणाऱ्या उटीच्या 'उटी रेडिओ टेलेस्कोप'च्या (ओआरटी) माध्यमातून डॉ. पी. के. मनोहरन यांच्या मार्गदर्शनाखाली गटाने या विषयीचे संशोधन केले आहे.

तसे झाल्यास यापूर्वी सतराव्या शतकामध्ये अवतरलेल्या छोट्या हिमयुगासारखेच वातावरण पुन्हा एकदा अनुभवायला मिळणार असल्याचा दावा या संशोधकांकडून करण्यात आला आहे. असे हिमयुग अवतरल्यास पृथ्वीच्या उत्तर गोलार्धातील तापमानात २ ते ३ अंशांनी घट होण्याची शक्यताही वर्तविण्यात



आली आहे.

डॉ. मनोहरन यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, सूर्याचे उष्णता बाहेर टाकण्याचे प्रमाण हळूहळू कमी होत आहे. सूर्याचे उष्णता बाहेर टाकण्याचे काम सौरचक्राच्या माध्यमातून सुरू असते. हे सौरचक्र साधारणतः ११ वर्षांचे असते. त्यातील काही काही काळ सूर्य अधिक उष्णता बाहेर टाकत असतो, तर काही काळ त्याचे प्रमाण कमी होते. नुकत्याच अनुभवलेल्या सौरचक्रामध्ये सूर्य कमी प्रमाणामध्ये उष्णता बाहेर टाकत असून हा प्रकार जवळपास ८०० दिवसांपेक्षाही जास्त काळ सुरू आहे. हे सर्व सौरडागविरहीत दिवस आहेत. यापूर्वी हा कालावधी कधीही ३०० दिवसांपेक्षा जास्त नव्हता. या ८०० दिवसांच्या कालखंडामध्ये 'ओआरटी'ला खूप मोठे बदल अनुभवायला मिळाले. तसेच सूर्याकडून पृथ्वीकडे येणाऱ्या ऊर्जावाहक कणांची संख्याही कमी होत असल्याचे या संशोधकांच्या लक्षात आले आहे. या पूर्वीच्या १९८१, १९९१ आणि २००१-२००२ सालातील सौरचक्रांच्या तुलनेचा त्यासाठी आधार घेण्यात आला आहे.